संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
17 JUL 2026
प्राप्त झाले सही....

**सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करणेबाबत.**
**श्री. मनेष वि. वाघीरकर, संचालक.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- ई-ऑफीस क्र. १७२१९८४/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-१३.०७.२०२६.

01491/2026/1973
20.7.2026

**संदर्भ:-**

१. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचे आदेश क्र.झोपुप्रा/प्रशा/कार्या-/टे-२/८१४/२०२४, दिनांक २०.१२.२०२४.
२. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्री. वाघीरकर/प्रतिक्षाधीन/०१-२०२५/०४७, दिनांक २१.०१.२०२५.
३. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचे आदेश क्र.स्था.१८/ब/श्री. मनेष वाघीरकर/प्रति. संचालक/रुजू/आस्था-२/२३-अ, दिनांक २२.०१.२०२५.
४. वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको-२०२५/प्र.क्र.०२/कोषा.प्रशा-२, दि.१४.०२.२०२५.
५. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-1/श्री.वाघीरकर/प्रतिक्षाधीन/०२-२०२५/८६, दिनांक १४.०२.२०२५.
६. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचे पत्र क्र.स्था.18/ब/प्रतिक्षाधीन/श्री.मनेष वाघीरकर/आस्था-२/१०६१, दिनांक १३.०८.२०२५.
७. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१.
८. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६.
९. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेवको / प्रशा-राप / का.६ / स.प्र.का /म.वि.वाघीरकर/०६.२६ / ७९० / ६४१ / ३०९१, दिनांक १७.०६.२०२६.

209

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातील श्री. मनेष विश्वनाथराव वाघीरकर हे वित्त नियंत्रक (संचालक), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई या पदावर कार्यरत असताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचे संदर्भाधिन दिनांक २०.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्री. वाघीरकर यांना वित्त नियंत्रक (संचालक), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई या प्रतिनियुक्तीच्या पदावरुन दिनांक २०.१२.२०२४ (म.नं.) रोजीपासून कार्यमुक्त करण्यात आले.

21.07.26

२) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे दिनांक २१.०१.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्री. वाघीरकर यांना पदस्थापनेच्या प्रतिक्षेत दिनांक ०१.०१.२०२५ (म.पू.) रोजी संचालनालयात रुजू करुन घेण्यात आले. श्री. वाघीरकर यांची सेवा उपयोगात आणण्याकरीता संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई या कार्यालयास त्यांची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली.

३) संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांचे संदर्भाधिन दिनांक २२.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. वाघीरकर यांना दिनांक २२.०१.२०२५ (म.पू.) रोजीपासून स्थानिक निधी लेखापरीक्षा

संचालनालयात रुजू करुन संचालनालयातील पंचायत राज समिती या शाखेचे कामकाज त्यांचेकडे सोपविण्यात आले.

४) वित्त विभाग, शासन आदेश दिनांक १४.०२.२०२५ अन्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेले श्री. वाघीरकर यांना संचालक (वित्त व लेखा), आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई या पदावर नियमित पदस्थापना देण्यात आली.

५) श्री. वाघीरकर यांना वरील पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्यासाठी संचालनालयाचे दिनांक १४.०२.2025 रोजीच्या आदेशान्वये संचालनालयातून दिनांक १४.०२.२०२५ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

६) श्री. वाघीरकर यांना दिनांक ०१.०१.२०२५ ते दिनांक १४.०२.२०२५ पर्यंत एकूण ४५ दिवस म्हणजेच नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. सदर कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून नियमित करणे आवश्यक आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.०१.०१.२०२५ ते दि.२१.०१.२०२५ | २१ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालयात कार्यरत. |
| दि.२२.०१.२०२५ ते दि.१४.०२.२०२५ | २४ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई कार्यालयात कार्यरत. |
| **एकूण** | **४५** | |

७) यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) व (जी) तसेच, शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६ मधील तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातील श्री. मनेष विश्वनाथराव वाघीरकर यांचा दिनांक ०१.०१.२०२५ ते दिनांक १४.०२.२०२५ रोजीपर्यंतच्या एकूण ४५ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता लेखा अधिकारी (र. व. का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.अ.भसारकर
२३.०६.२०२६

**(अ. अ. भसारकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१) मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*

५) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई,*
६) श्री. मनेष विश्वनाथराव वाघीरकर, संचालक*
७) लेखा अधिकारी (र. व. का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)